# रोटरीकरांकडून वारकऱ्यांची सेवा

## उपक्रमाचे सातवे वर्ष

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**अंबरनाथ :** येथील रोटरी क्लबच्या विविध शाखांच्या माध्यमातून दरवर्षी आषाढी वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांची जेजुरी येथील वारीच्या मुक्काम स्थानी सेवा केली जाते. रोटरी क्लबच्या वतीने यंदाही हा उपक्रम राबविण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ, रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ नॉर्थ, रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ वेस्ट, रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ इंडस्ट्रियल आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मिड टाऊन अशा पाच रोटरी क्लबच्या सभासदांनी जेजुरी येथे उपस्थित राहून पंढरीच्या वारकऱ्यांची सेवा केली. या उपक्रमाचे यंदाचे हे सातवे वर्ष आहे. यामध्ये ४८ सभासद यंदाच्या वर्षी जेजुरी येथे वारकऱ्यांच्या सेवेकरिता दाखल झाले होते. यावेळी दरवर्षीप्रमाणे अंबरनाथचे आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनीदेखील वारकऱ्यांची सेवा करत या उपक्रमात सहभाग घेतला.

आळंदी देवस्थानच्या श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीने संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी २०२४ चे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर अंबरनाथमधील रोटरी क्लब सदस्यांकडून जेजुरी येथे असणाऱ्या पालखीच्या मुक्काम स्थळी वारकऱ्यांची सेवा केली जाते. आषाढी वारीसाठी २९ जून २०२४ रोजी निघालेली पालखी यात्रा ५ जुलै रोजी जेजुरी येथे मुक्कामी होती. मोफत औषध वाटप, सोबतच पायी चालणाऱ्या भक्तांच्या पायांची मालिश करणे, अनवाणी सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना पादत्राण वाटप तसेच इतर आवश्यक गोष्टींचे वाटप रोटरीच्या वतीने करण्यात आले.

## बदलापुरात हस

बदलापूरः हस्ताक्षर सुधार
मंदिर येथे आयोजन करण्
विषयातील विद्यावाचस्पती
विद्यार्थ्यांना विनामूल्य मार्ग
प्रतिसादामुळे हा कार्यक्रम
सुधारणेवर राज्यभर कार्य
७९६ वा कार्यक्रम होता.

